सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : ३२२ | शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**

**आजचे भाव**

| | |
|---|---|
| २४ सोने ९९.५०% | ₹ १५०४०० |
| २२ Ct सोने ९१.६०% | ₹ १३९४०० |
| १८ Ct सोने ७५.००% | ₹ ११६००० |
| शुद्ध चांदी ९९९% | ₹ २३६०/- |

भाव प्रती १० ग्राम


## आजचे अभीष्टचिंतन



**श्री.विक्रांत पाटील**
माजी नगरसेवक, अमळनेर



**सौ. विणा कुलकर्णी**
अमळनेर



**श्री. चंद्रकांत कामदार**
अमळनेर



**डॉ. विजय पवार**
अमळनेर



**डॉ. मोनिका भदाणे (दहिवेलकर)**
अमळनेर/पुणे



**श्री. गोपाल पाठक**
सेवेकरी, मंगळग्रह मंदीर

# स्मशानभूमीनजीकचा भाग धोकेदायक!

## अमळनेर-चोपडा रोडवरील रस्ता खड्डेमय, कठडे नसलेला नाला, उघड्या सळयांमुळे अपघाताची भीती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अमळनेर-चोपडा रस्त्यावरील स्मशानभूमीजवळच्या भागात असलेल्या नाल्याच्या कड्यावर उघड्यावर पडलेल्या सळया वाहनचालक व पादचाऱ्यांसाठी धोकेदायक ठरत आहेत. त्यातच रस्ता खड्ड्यांनी व्यापलेला असून, नाल्यालगत सुरक्षात्मक कठडेच नसल्याने या ठिकाणी अपघाताचा धोका वाढला आहे. प्रशासनाने याकडे वेळीच लक्ष न दिल्यास मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अमळनेर-चोपडा हा दररोजचाच वर्दळीचा रस्ता आहे. या रस्त्यावरून दररोज शेकडोवर वाहने ये-जा करतात. पुढे अनेक गावांना जोडणारा हा प्रमुख रस्ता असल्याने अवजड वाहने, एसटी बस, प्रवासी वाहने, चारचाकी, दुचाकीस्वार तसेच पादचाऱ्यांची मोठी वर्दळ असते. परिसरात रहिवास वस्ती असल्याने नागरिकांचाही या ठिकाणी सतत वावर असतो.

स्मशानभूमीजवळील रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली असून, ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. खड्डे चुकविताना वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागते. विशेषतः रात्रीच्या वेळी खड्डे आणि नाल्याची धोकादायक स्थिती लक्षात न आल्यास वाहन नियंत्रण सुटण्याची शक्यता आहे. यातच नाल्याला योग्य सुरक्षात्मक कठडे नसल्याने धोका आणखी वाढला आहे. नियंत्रण सुटल्यास एखादे वाहन थेट नाल्यात जाऊ शकते. अशावेळी नाल्याच्या कड्यावर उघड्या अवस्थेत असलेल्या लोखंडी सळ्या वाहनधारकाच्या किंवा प्रवाशांच्या शरीरात घुसून गंभीर दुखापत होण्याबरोबरच जीवितहानीही होऊ शकते. त्यामुळे या उघड्या सळ्या तातडीने हटविणे अथवा सुरक्षित करणे गरजेचे आहे.

एकीकडे खड्डेमय रस्ता, दुसरीकडे नाल्याला कठड्यांचा अभाव आणि त्यातच धोकादायक पद्धतीने उघड्या असलेल्या लोखंडी सळ्या, अशी धोक्यांची त्रिसूत्री या ठिकाणी निर्माण झाली आहे. एखादी दुर्घटना घडल्यानंतर प्रशासनाने उपाययोजना करण्यापेक्षा त्यापूर्वीच खबरदारी घेणे आवश्यक आहे.

### दुर्लक्ष न करता कठडे बसविण्याची मागणी

*संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग व स्थानिक प्रशासनाने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देऊन पाहणी करावी. नाल्याला मजबूत सुरक्षात्मक कठडे बसवावेत, उघड्या सळ्या हटवून त्या सुरक्षित कराव्यात तसेच रस्त्यावरील खड्ड्यांची कायमस्वरूपी दुरुस्ती करावी, अशी मागणी वाहनधारक व परिसरातील नागरिकांकडून होत आहे. अपघाताची वाट पाहण्याऐवजी प्रशासनाने वेळीच उपाययोजना करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.*




# चोरीच्या दुचाकी विकताना वेळोद्याचा तरुण अटकेत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : चोरीच्या मोटारसायकली विक्री करणाऱ्या दलालाला अमळनेर पोलिसांनी चोपडा तालुक्यातील ग्रामीण भागातून ताब्यात घेत अटक केली. विनायक उखा पाटील (रा. वेळोदे, ता. चोपडा) असे अटक केलेल्या संशयिताचे नाव आहे. त्याच्याकडून चोरीच्या दोन मोटारसायकली जप्त करण्यात आल्या असून, एका मोटारसायकल चोरीचा उलगडा झाला आहे. दरम्यान, दुचाकी चोरी करणारा पाचोरा परिसरातील त्याचा साथीदार असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. शिरूड नाका परिसरातील श्रीराम कॉलनीतील हरेश गंभीर चौधरी यांची २५ हजार रुपये किमतीची एमएच १९ ए.क्यू. २१६२ क्रमांकाची मोटारसायकल चोरीला गेली होती. याप्रकरणी अमळनेर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलिस निरीक्षक दत्तात्रय निकम यांना विनायक पाटील हा चोरीच्या मोटारसायकली विकत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्याच्या हालचालींवर लक्ष ठेवून चोपडा ग्रामीण परिसरात सापळा रचला. चोरीच्या मोटारसायकलवरून फिरताना पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले.

चौकशीत त्याच्याकडून हरेश चौधरी यांची चोरीस गेलेली मोटारसायकल तसेच आणखी एक दुचाकी जप्त करण्यात आली. विशेष म्हणजे, चोरीच्या दुचाकींची विक्री करणाऱ्या पाटीलकडून पोलिसांना मोटारसायकल चोराचा मागही मिळाला आहे. हा साथीदार



पाचोरा परिसरातील असल्याचे निष्पन्न झाले असून, त्याच्या अटकेसाठी पोलिसांचे प्रयत्न सुरू आहेत.

ही कारवाई पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलिस अधीक्षक अशोक नखाते व डीवायएसपी विनायक कोते यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उ.नि. शरद काकळीज, हेडकॉन्स्टेबल प्रमोद पाटील, नरेश बडगुजर, नितीन मनोरे व उज्वल पाटील यांच्या पथकाने केली. या कारवाईमुळे दुचाकी चोरीच्या आणखी घटनांचा उलगडा होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

# ‘हर हर महादेव’च्या जयघोषाने परिसर दुमदुमला

## कावड यात्रा : तापी मातेचे पूजन करून पवित्र जल घेत कावडधारी सेवेकऱ्यांची पायी वारी; मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे वैद्यकीय सेवा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : श्रावण महिन्याच्या पार्श्वभूमीवर भगवान महादेवाच्या भक्तीचा जागर करणारी कावड यात्रा जळोद येथून अमळनेरच्या दिशेने रवाना झाली. जळोद येथील तापी नदीपात्रात तापी मातेचे विधिवत पूजन करून कावडधारी सेवेकऱ्यांनी पवित्र जल घेतले व पायी कावड यात्रेला सुरुवात केली. यावेळी ‘हर हर महादेव’, ‘बम बम भोले’च्या जयघोषाने परिसर भक्तिमय झाला.

मंदिराचे पुरोहित शुभम गुरुजी, अजय निंबा पाटील, अक्षय कदम, गणेश शिंपी, अक्षय भागवत पाटील, मयूर चौधरी व अमोल पाटील यांच्यासह मंदिरातील सेवेकरी व तिथे रस्ता शहरासह ग्रामीण भागातील अनेक भाविक या कावड यात्रेत सहभागी झाले आहेत. पारंपरिक वेशभूषेत खांद्यावर सजविलेली कावड घेत सेवेकरी अमळनेरच्या दिशेने पायी मार्गक्रमण करीत आहेत. कावडीला सजविण्यात आलेल्या कलशांमध्ये तापी नदीचे पवित्र जल घेण्यात आले असून, हे जल अमळनेर येथील श्री वर्णेश्वर महादेव व मंगलेश्वर महादेव तसेच श्री मंगळ ग्रह मंदिरात अर्पण करण्यात येणार आहे. महादेवाच्या चरणी पवित्र जल अर्पण करून धार्मिक विधी करण्यात येणार असल्याने भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

कावड यात्रेत पायी वारी करणाऱ्या सेवेकरी व भाविकांसाठी मंगळ ग्रह सेवा संस्थेच्या वतीने वैद्यकीय सेवेची व्यवस्था करण्यात आली. यात्रेच्या मार्गावर आवश्यक वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यात आली.यावेळी मंगळग्रह सेवा संस्थेचे सचिव सुरेश बाविस्कर, सहसचिव दिलीप बहिरम, विश्वस्त डी. एस. सोनवणे, मंगल सेवेकरी प्रकाश मेघा, डॉ. पिंगळे, मंदिराचे डेटा मॅनेजर, मंदिराचे पुरोहित शुभम गुरुजी, मंगल सेवेकरी तसेच सुरक्षा रक्षक उपस्थित होते. श्रद्धा, सेवा आणि भक्तीचा त्रिवेणी संगम असलेल्या या कावड यात्रेमुळे जळोद ते अमळनेरचा मार्ग ‘हर हर महादेव’च्या जयघोषाने दुमदुमून गेला.

(संबंधित छायाचित्रे पान २ वर)

### गर्व से कहो स्वदेशी है हम...! देशी ही खरिदेंगे हम...!!

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**



## संपादकीय

# अडचणीत सापडलेल्या पत्रकारांचा आधार आणि एकजुटीचा मंत्र..!

जगाच्या डोळ्यांतील अश्रू पुसणारा, समाजाच्या वेदनांना स्वतःच्या शब्दांतून वाट करून देणारा पत्रकार... पण कधी विचार केलाय का, की या दुसऱ्यांच्या जखमांवर फुंकर घालणाऱ्या पत्रकाराच्या स्वतःच्या हृदयातील जखमा किती खोल असतात? दिवस-रात्र, ऊन-पाऊस, वादळ-वाऱ्याची तमा न बाळगता, स्वतःच्या संसाराची राखरांगोळी करून जो पत्रकार समाजासाठी धावत सुटतो, त्याच्याच घरात संध्याकाळी चुलीवर काय शिजणार, हा प्रश्न जेव्हा उभा राहतो, तेव्हा काळजाचे पाणी-पाणी होते. स्वतःच्या लेकरांचे शिक्षण, आजारपणात उपचारासाठी लागणारा पैसा, आणि म्हातारपणी डोक्यावर हक्काचे छत्र नसण्याची भीती... या विचाराने कित्येक रात्री या लेखणीच्या सैनिकाने उशीत तोंड लपवून अश्रू ढाळले असतील, याची मोजदाद कुणाकडेच नाही. पत्रकारिता करताना पावलोपावली उभी ठाकणारी धोक्याची वळणे, धमक्या आणि असुरक्षितता यांमुळे आज प्रत्येक पत्रकाराला एका आपुलकीच्या छत्रछायेची, एका भक्कम 'सुरक्षा कवचाची' तीव्र गरज भासत आहे. राज्यात आणि देशात पत्रकार संघटना अनेक आहेत, परंतु केवळ नावापुरत्या न राहता पत्रकारांच्या प्रत्यक्ष अडचणी आणि समस्या सोडवणारी खरी संघटना म्हणजेच 'व्हॉईस ऑफ मीडिया' होय! याच गंभीर परिस्थितीचे भान ठेवून, *Press Media Live* च्या वतीने राज्यातील सर्व पत्रकार बांधवांना हे अत्यंत नम्र आणि आत्मीय आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी आता एकमेकांचे अश्रू पुसत, सुरक्षिततेचा आणि एकजुटीचा मार्ग म्हणून 'व्हॉईस ऑफ मीडिया' या संघटनेमध्ये सामील व्हावे. पत्रकाराच्या पाठीवर मायेचा हात ठेवून, त्याला संकटाच्या वेळी "मी तुझ्या सोबत आहे" असा दिलासा देणारे खरोखरच भक्कम सुरक्षा कवच म्हणजे 'व्हॉईस ऑफ मीडिया'!

संदीप काळे यांनी अत्यंत संवेदनशीलतेने आणि आत्मीयतेने गुंफलेली ही संघटना केवळ एक व्यासपीठ नाही, तर हा प्रत्येक एकाकी पडलेल्या पत्रकाराचा हक्काचा परिवार आहे. गल्लीबोळातील, तळागाळातील पत्रकाराच्या वेदनेला जागतिक स्तरावर मान मिळवून देणारा हा विश्वासाचा धागा आहे.पण हे सुरक्षा कवच तेव्हाच मजबूत होईल, जेव्हा आपण सगळे आपले लहान-मोठे मतभेद, आपसातले वाद आणि अहंकार मनातून कायमचे काढून टाकू. विचार करा, आपणच जर एकमेकांपासून दुरावत गेलो, तर या कठीण जगात आपल्या अश्रूंना कुणी पुसणार? संघटनेत काम करताना सर्व आपापसातील वाद बाजूला ठेवून, एक कुटुंब म्हणून एकत्र येणे ही आज आपल्या अस्तित्वाची गरज आहे. जेव्हा एक पत्रकार दुसऱ्या पत्रकाराच्या दुःखात धावून येईल, तेव्हाच आपल्या लेखणीला खरी ताकद लाभेल.

पत्रकाराला काय हवे असते? फक्त थोडासा सन्मान, आजारपणात आरोग्याची साथ, मुलांच्या भविष्याची निश्चिंतता आणि म्हातारपणी सन्मानाने जगण्याचा आधार! संघटना अनेक असल्या तरी 'व्हॉईस ऑफ मीडिया'ने पत्रकारांच्या याच हळव्या आणि नाजूक नसारा धरून, त्यांच्या अडचणी सोडवण्याचा आणि कल्याणाचा जो मायेचा पदर पसरवला आहे, तो मनाला स्पर्श करून जातो जेव्हा पत्रकार सुरक्षित असेल, समाधानी असेल, तेव्हाच त्याची लेखणी निर्भयपणे अन्यायाविरुद्ध बोलेल. म्हणूनच *Press Media Live* पुन्हा एकदा सर्व पत्रकारांना आवाहन करते की, आपसातील सर्व वाद विसरून या आशेच्या सावलीत एकत्र या. हे विश्वासाचे सुरक्षा कवच प्रत्येक पत्रकाराच्या आयुष्यात सुखाचे आणि सुरक्षिततेचे दिवस आणेल, हाच अंतःकरणापासूनचा एक आर्त टाहो या अग्रलेखाच्या माध्यमातून मांडत आहोत.

## श्रद्धा, सेवा आणि भक्तीचा संगम



अमळनेर : तापी मातेचे विधिवत पूजन करून पवित्र जल कलशात घेत जळोदहून अमळनेरच्या दिशेने पायी निघालेली कावड यात्रा. तसेच खांद्यावर कावड घेतलेल्या सेवेकऱ्यांच्या 'हर हर महादेव'च्या जयघोषाने संपूर्ण मार्ग भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला. (छायाचित्रे : मयूर चौधरी)

# आवास प्लसची यादी १५ ऑगस्टला ग्रामसभेत पात्र-अपात्र लाभार्थ्यांची होणार छाननी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत 'आवास प्लस २०२४'मधील लाभार्थ्यांची कायम प्रतीक्षा यादी अंतिम करण्यासाठी १५ ऑगस्ट रोजी ग्रामसभा घेण्यात येणार आहे. या ग्रामसभेत ड्राफ्ट कायम प्रतीक्षा यादी ग्रामस्थांसमोर ठेवून लाभार्थ्यांची पात्रता, कागदपत्रे आणि निकषांची छाननी केली जाणार आहे. त्यामुळे यादीत नाव असलेल्या लाभार्थ्यांचे लक्ष ग्रामसभेकडे लागले आहे. ग्रामसभेत ड्राफ्ट यादीतील चुकीची नावे, अपात्र लाभार्थी तसेच आवश्यक दुरुस्त्यांबाबत चर्चा करून शिफारसी करण्यात येणार आहेत. ग्रामसभेच्या शिफारशीनुसार आवाससॉफ्ट प्रणालीमध्ये आवश्यक बदल करून अंतिम कायम प्रतीक्षा यादी तयार केली जाणार आहे.

**यादी ग्रामस्थांच्या अवलोकनासाठी ठेवणे बंधनकारक**

ग्रामपंचायतींना ड्राफ्ट यादी ग्रामसभा होण्यापूर्वीच सर्व नागरिकांच्या अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच ग्रामसभेची कार्यवाही, जिओ-टॅग छायाचित्रे आणि स्पष्ट समूह छायाचित्रे प्रणालीवर अपलोड करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ग्रामसभेने सुचविलेल्या बदलांनुसारच नोंदी कराव्यात, तसेच अपूर्ण किंवा चुकीची कागदपत्रे अपलोड करू नयेत, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

**या कुटुंबांना लाभ मिळणार नाही**

आवास योजनेच्या निकषांनुसार पक्के छत किंवा पया भिंती असलेले घर तसेच दोनपेक्षा अधिक खोल्या असलेली कुटुंबे अपात्र ठरणार आहेत. याशिवाय मोटारचालित तीन किंवा चारचाकी वाहनधारक, यांत्रिकीकृत कृषी उपकरणे असलेली कुटुंबे आणि ४० हजार रुपये किंवा त्यापेक्षा अधिक पतमर्यादा असलेले किसान क्रेडिट कार्डधारक यांनाही लाभ मिळणार नाही.कुटुंबातील कोणताही सदस्य शासकीय कर्मचारी असल्यास, शासनाकडे नोंदणीकृत बिगरशेती उद्योग असल्यास किंवा कुटुंबातील सदस्याचे मासिक उत्पन्न १९ हजार रुपयांपेक्षा अधिक असल्यासही अपात्रता लागू होणार आहे. तसेच आयकर किंवा व्यावसायिक कर भरणारे आणि निकषांतील मर्यादेपेक्षा अधिक जमीनधारक कुटुंबेही योजनेच्या लाभापासून वंचित राहणार आहेत.

**अमळनेर तालुक्यात हजारो घरकुले पूर्ण**

अमळनेर तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणावर घरकुलांची कामे पूर्ण झाली आहेत. टप्पा एकमध्ये ६ हजार ३४१, टप्पा दोनमध्ये ३ हजार ५६६ घरकुले पूर्ण झाली असून टप्पा तीनमध्ये १० हजार ४२ घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

याशिवाय मोदी आवास योजनेअंतर्गत २ हजार १४०, शबरी आवास योजनेअंतर्गत १ हजार ४५७ आणि रमाई आवास योजनेअंतर्गत १ हजार ३३८ घरकुले पूर्ण झाल्याची माहिती गटविकास अधिकारी एन. आर. पाटील यांनी दिली. ग्रामसभेतील पात्रता व कागदपत्रांची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर ग्रामसभेच्या शिफारशीनुसार आवाससॉफ्टमध्ये आवश्यक बदल करण्यात येतील. त्यानंतर अंतिम कायम प्रतीक्षा यादी जाहीर केली जाणार आहे. त्यामुळे ड्राफ्ट यादीत नाव असलेल्या लाभार्थ्यांनी १५ ऑगस्टच्या ग्रामसभेला उपस्थित राहून आपल्या नावाची, कागदपत्रांची आणि पात्रतेची खात्री करून घ्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# ४० हजार मतदारांची नावे 'एएसडी' यादीत

## १७ ऑगस्टपर्यंत बीएलओशी संपर्काचे आवाहन

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अमळनेर : भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेंतर्गत अमळनेर विधानसभा मतदारसंघातील मतदार यादी अद्ययावत करण्याची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. या मोहिमेत तब्बल ४० हजार मतदारांची नावे 'एएसडी' यादीत आढळून आल्याने प्रशासनाकडून या नोंदींची पडताळणी केली जात आहे. संबंधित मतदारांनी १७ ऑगस्टपर्यंत आपल्या भागातील बीएलओशी संपर्क साधून आवश्यक माहिती व कागदपत्रे सादर करावीत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

मतदार यादीतील दुबार नोंदी, मृत व्यक्तींची नावे, स्थलांतरित मतदार तसेच संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष वास्तव्य नसलेल्या मतदारांची माहिती तपासण्यासाठी बीएलओमार्फत घराघरांत जाऊन पडताळणी करण्यात आली. या प्रक्रियेदरम्यान मोठ्या संख्येने नावे 'एएसडी' यादीत समाविष्ट झाल्याचे समोर आले आहे.

'एएसडी' म्हणजे अनुपस्थित, स्थलांतरित आणि मयत मतदारांच्या नोंदींची यादी. या यादीत नाव आल्याने संबंधित मतदाराचे नाव तात्काळ मतदार यादीतून वगळले जाते, असा त्याचा अर्थ नाही. प्रत्येक नोंदीची पडताळणी करून पात्र मतदाराचे नाव कायम ठेवण्याची कार्यवाही केली जाणार आहे.

दरम्यान, अमळनेर विधानसभा मतदारसंघात वास्तव्यास असलेल्या एखाद्या जिवंत व पात्र मतदाराचे नाव 'एएसडी' यादीत आढळल्यास संबंधितांनी बीएलओशी संपर्क साधून आपले वास्तव्य व पात्रता सिद्ध करणारी आवश्यक माहिती व कागदपत्रे सादर करावीत. त्यानंतर नोंदीची पडताळणी करून नाव मतदार यादीत कायम ठेवण्याची प्रक्रिया केली जाणार आहे.

**कुटुंबातील प्रत्येकाचे नाव तपासा**

प्रशासनाने नागरिकांना आपल्या कुटुंबातील सर्व पात्र सदस्यांची नावे मतदार यादीत आहेत की नाहीत, याची खात्री करण्याचे आवाहन केले आहे. स्वतःचे किंवा कुटुंबातील कोणत्याही पात्र सदस्याचे नाव 'एएसडी' यादीत असल्यास १७ ऑगस्टपूर्वी बीएलओशी संपर्क साधणे महत्त्वाचे आहे. स्थलांतरानंतर जुन्या ठिकाणी कायम असलेल्या नोंदी, मृत व्यक्तींची नावे आणि प्रत्यक्ष वास्तव्य नसलेल्या मतदारांच्या नोंदींची सखोल छाननी सुरू आहे. पात्र मतदाराचे नाव चुकीने वगळले जाऊ नये आणि मतदार यादी अधिक अचूक व विश्वासार्ह व्हावी, यासाठी नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी मयूर भंगाळे यांनी केले आहे.

# शाश्वती ॲकॅडमीतर्फे उद्या गुणवंतांचा सत्कार

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील शाश्वती ॲकॅडमीतर्फे शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी गुणवंत विद्यार्थी व विद्यार्थिनींचा सत्कार तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सन्मान सोहळा आयोजित केला आहे. वाणी समाज मंगल कार्यालयात दुपारी २ वाजता हा सोहळा होणार आहे. शाश्वती ॲकॅडमीच्या कार्याला यंदा १९ वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने हा विशेष सोहळा आयोजित केला आहे.

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी खानदेश शिक्षण मंडळाच्या संचालिका सौ. लीनाताई प्रवीण पाटील असतील. तर प्रमुख अतिथी म्हणून मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, देवळी (ता. अमळनेर) येथील वसंताई बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील, देवपूर-धुळे येथील साईबाबा शैक्षणिक व सांस्कृतिक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष उदय महाजन, खानदेश शिक्षण मंडळाच्या विश्वस्त सौ. वसुंधराताई दशरथ लांडगे, सॉर्टेक कॉम्प्युटर एज्युकेशन, अमळनेरचे

संस्थापक कैलास पाटील, बिल्डर तथा नाशिक येथील साळी समाजाचे सहसचिव प्रकाश खंडारे, कबचौउमविच्या भौतिकशास्त्र प्रशालेचे संचालक प्रा. जयदीप साळी, अमळनेरमधील व्यावसायिक रमेश महाजन उपस्थित राहणार आहेत. ॲड. सौ. कल्याणी व प्रशांत खंडारे कार्यक्रमाचे मार्गदर्शक असतील. तर व्यावसायिक तथा साळी समाज, अमळनेरचे ज्येष्ठ मार्गदर्शक पुरुषोत्तम लष्करे, लोकमान्य शिक्षण मंडळ, अमळनेरचे माजी मुख्याध्यापक रवींद्र लष्करे, फैजपूरमधील ज्ञानदीप स्पर्धा परीक्षा क्लासेसचे संचालक तथा सामाजिक कार्यकर्ते संजय सातपुते, प्रगती बुक्स, अमळनेरचे संचालक तथा व्यापारी नंदलाल भावसार हेही यावेळी उपस्थित राहणार आहेत.

यावेळी विविध क्षेत्रांतील विशेष सहकार्य करणाऱ्या मान्यवरांचाही सन्मान करण्यात येणार आहे. कार्यक्रमास पालक, विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



संत शिरोमणी संतश्रेष्ठ श्री नामदेव महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त वाडी संस्थान येथे आयोजित कार्यक्रमात आरतीचा करताना सहपत्निक पिंटू शिंपी

# संत नामदेव महाराज पुण्यतिथीनिमित्त शिंपी समाजाचा उपक्रम

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : संत शिरोमणी संतश्रेष्ठ श्री नामदेव महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त शिंपी समाजाच्या वतीने विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. वाडी संस्थान येथे झालेल्या या कार्यक्रमात समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यावेळी हॉटेल साई दरबारचे संचालक पिंटू भाऊ शिंपी यांना आरतीचा मान देण्यात आला. तसेच माजी नगरसेवक आबासो प्रताप शिंपी यांच्या हस्ते शिंपी समाज संचालक मंडळातील सदस्यांचा सत्कार करून त्यांना सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी समाजबांधवांकडून वर्गणी जमा करण्यात आली होती. त्यातून सुमारे दोन हजार नागरिकांसाठी सामुदायिक भोजनाची व्यवस्था करण्यात आली. समाजातील एकोपा, बंधुभाव आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

# एक महिन्याच्या बाळाला रेल्वे डब्यात सोडून गेलेल्या आई बापाचा शोध

## रेल्वे पोलिसांकडून दहा हजाराचे बक्षीस जाहीर

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : महिना भरापूर्वी जन्मलेल्या बाळाला धावत्या रेल्वेच्या डब्यात सोडून गेलेल्या निर्दयी आई बापाचा शोध वर्षभरापासून लागला नसल्याने अखेर रेल्वे पोलिसांनी माहिती देणाऱ्यास दहा हजाराचे बक्षीस जाहीर केले आहे. वर्षभरापासून बाळाची देखभाल धुळे शिशु केंद्रात केली जात आहे.

९ मे २०२५ रोजी ट्रेन क्रमांक १९००८ भुसावळसुरत एक्सप्रेसच्या जनरल कोचमध्ये अंदाजे एक महिन्याच्या नवजात शिशूला सोडून देण्यात आले होते. हे शिशू धरणगाव ते अमळनेरदरम्यान रेल्वेगाडीत सोडून देण्यात आल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

या प्रकरणी रेल्वे पोलीस स्टेशन, नंदुरबार येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ४८/२०२५ नोंद करण्यात आला असून, भारतीय न्याय संहितेच्या कलम ९३ अन्वये तपास सुरू आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, या प्रकरणाशी संबंधित अनोळखी महिलेचे वय अंदाजे २० ते २२ वर्षे आहे. सदर महिला किंवा बेवारस नवजात शिशूच्या पालकांबाबत कोणतीही माहिती असल्यास ती तातडीने पोलिसांना देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

माहिती देणाऱ्या व्यक्तीची ओळख गोपनीय ठेवण्यात येणार असून, उपयुक्त माहिती देणाऱ्यास १० हजार रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे.

**नागरिकांनी संपर्क साधावा असे आवाहन**

रेल्वे पोलीस स्टेशन नंदुरबारचे प्रभारी अधिकारी राहुल त्र्यंबक शेजवळ यांनी केले असून ७०३०४४७००७ / ८७८८१५७८५८ या क्रमांकावर संपर्क साधावा असेही आवाहन करण्यात आले आहे.

गेल्या वर्षभरापासून धुळे येथील शिशु गृहात या बाळाची देखभाल केली जात आहे. पोलिसांना देखील तपास लागत नाही. बेवारस नवजात शिशूच्या पालकांपर्यंत पोहोचण्यासाठी नागरिकांनी पुढे येऊन पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन अमळनेर रेल्वे पोलीस (GRP) यांनी केले आहे.



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# १६ साल की उम्र में खो दिया था सुनने की क्षमता

## ४ माह की तैयारी में यूपीएससी क्रैक, बनीं आयएएस

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ऐसे में कुछ उम्मीदवारों की सफलता की कहानी न सिर्फ प्रेरणा देती है, बल्कि यह भी बताती है कि मुश्किल परिस्थितियों के बावजूद लक्ष्य को हासिल किया जा सकता है। ऐसी ही प्रेरणादायक कहानी आयएएस अधिकारी सौम्या शर्मा की है।

संघ लोक सेवा आयोग (यूपीएससी) की सिविल सेवा परीक्षा देश की सबसे कठिन प्रतियोगी परीक्षाओं में शामिल है। हर साल लाखों उम्मीदवार इस परीक्षा में शामिल होते हैं, लेकिन कुछ चुनिंदा अभ्यर्थी ही सफलता हासिल कर पाते हैं। ऐसे में कुछ उम्मीदवारों की सफलता की कहानी न सिर्फ प्रेरणा देती है, बल्कि यह भी बताती है कि मुश्किल परिस्थितियों के बावजूद लक्ष्य को हासिल किया जा सकता है। ऐसी ही प्रेरणादायक कहानी आयएएस अधिकारी सौम्या शर्मा की है।

**सक्सेस स्टोरी**

सौम्या शर्मा ने कई चुनौतियों के बावजूद साल २०१७ की यूपीएससी सिविल सेवा परीक्षा में शानदार प्रदर्शन किया और ऑल इंडिया रैंक ९ हासिल की। खास बात यह है कि उन्होंने यूपीएससी की तैयारी के लिए करीब चार महीने का समय दिया था। अपनी मेहनत और मजबूत इच्छाशक्ति के दम पर उन्होंने पहले ही प्रयास में परीक्षा पास कर प्रशासनिक सेवा में जगह बनाई।

### दिल्ली की रहने वाली हैं सौम्या शर्मा

सौम्या शर्मा मूल रूप से दिल्ली की रहने वाली हैं और उनकी शुरुआती पढ़ाई भी दिल्ली में ही हुई। उनके माता-पिता अशोक शर्मा और लीना शर्मा पेशे से डॉक्टर हैं। घर में पढ़ाई का अच्छा माहौल होने के कारण सौम्या को शुरुआत से ही शिक्षा के प्रति प्रोत्साहन मिला। उन्होंने स्कूली शिक्षा पूरी करने के बाद नेशनल लॉ स्कूल से कानून की पढ़ाई की। लॉ की पढ़ाई के दौरान ही उन्होंने सिविल सेवा में जाने का मन बना लिया था। इसके बाद उन्होंने यूपीएससी परीक्षा की तैयारी शुरू की और अपने लक्ष्य को हासिल करने के लिए पूरी मेहनत से जुट गईं।

### १६ साल की उम्र में खो दी सुनने की क्षमता

सौम्या शर्मा की लाइफ में एक बड़ा मोड़ तब आया, जब महज १६ साल की उम्र में उन्होंने अपनी सुनने की क्षमता खो दी। इतनी कम उम्र में इस तरह की चुनौती का सामना करना किसी के लिए भी आसान नहीं होता। हालांकि, सौम्या ने इस परिस्थिति को अपनी कमजोरी नहीं बनने दिया। उन्होंने अपने सपने को जिंदा रखा और आगे बढ़ने का फैसला किया। सुनने की क्षमता खोने के बावजूद उन्होंने अपनी पढ़ाई जारी रखी और बाद में यूपीएससी जैसी कठिन परीक्षा में शानदार सफलता हासिल कर यह साबित किया कि परिस्थितियां चाहे कितनी भी चुनौतीपूर्ण क्यों न हों, मजबूत इच्छाशक्ति से लक्ष्य हासिल किया जा सकता है।

### सिर्फ चार महीने की तैयारी में यूपीएससी क्रैक

सौम्या शर्मा ने वर्ष २०१७ में यूपीएससी सिविल सेवा परीक्षा देने का फैसला किया। इसके बाद उन्होंने करीब चार महीने तक परीक्षा की तैयारी की। वह घर पर रोजाना लगभग १० से १५ घंटे तक पढ़ाई करती थीं। उन्होंने अपनी तैयारी में सेल्फ स्टडी पर खास जोर दिया और सीमित समय में ज्यादा से ज्यादा सिलेबस कवर करने

**की रणनीति अपनाई।**

उनकी मेहनत का नतीजा यह रहा कि उन्होंने अपने पहले ही प्रयास में सिविल सेवा परीक्षा पास कर ली और ऑल इंडिया रैंक ९ हासिल की। इस सफलता ने उन्हें देशभर में पहचान दिलाई।

### बीमारी में भी नहीं छोड़ी पढ़ाई

सौम्या का यूपीएससी सफर सिर्फ कम समय में तैयारी करने तक सीमित नहीं था। मुख्य परीक्षा के दौरान उनकी तबीयत भी काफी खराब थी। एक दिन उनकी हालत इतनी खराब हो गई कि उन्हें दिन में तीन बार सलाइन चढ़ानी पड़ी। इसके बावजूद उन्होंने अपनी तैयारी और परीक्षा को बीच में नहीं छोड़ा।

### सफलता का राज

सौम्या का मानना है कि यूपीएससी की तैयारी में सबसे महत्वपूर्ण चीज निरंतर मेहनत और सेल्फ स्टडी है। उनके अनुसार, अगर किसी उम्मीदवार को खुद पढ़ाई करके परीक्षा पास करने का भरोसा है तो उसके लिए कोचिंग अनिवार्य नहीं है। हालांकि, जिन उम्मीदवारों को सही दिशा और मार्गदर्शन की जरूरत महसूस होती है, वे कोचिंग की मदद ले सकते हैं।

उनका कहना है कि कोचिंग लेने के बाद भी सेल्फ स्टडी बेहद जरूरी है। अगर उम्मीदवार सही टाइम टेबल बनाकर नियमित रूप से मेहनत करे और अपनी तैयारी पर लगातार फोकस बनाए रखे, तो सफलता हासिल की जा सकती है। सौम्या शर्मा की कहानी इसी दृढ़ संकल्प और मेहनत की मिसाल है।



# मुघलांच्या खजिन्यातून दिवस-रात्र धूर का निघायचा?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मुघलांच्या खजिन्यातून दिवस-रात्र धूर निघत असे. मात्र, हा धूर का निघायचा, यामागील नेमके कारण काय? जाणून घ्या.

**'सोने की चिडिया' :** भारताची संपत्ती आणि बाजारपेठ पाहून परदेशी सत्ताधीशही थक्क व्हायचे. बाबरनेही हिंदुस्थानची समृद्धी पाहून इथे सत्ता उभी करण्याचा निर्णय घेतला.

**मुघलांचा खजिना :** बाबरनंतर मुघल सत्तेचा विस्तार झाला आणि कर, व्यापार, भेटवस्तू तसेच जिंकलेल्या प्रदेशांतून मिळणाऱ्या संपत्तीमुळे शाही खजिना भरत गेला.

**अकबरचा खजिना :** अकबराचा खजिना म्हणजे एखादं साधं कोठार नव्हते. अबुल फजलने त्याची तुलना थेट मोठ्या कारखान्याशी केली होती.



**मोठी टीम :** शाही खजिन्यात प्रत्येक कामासाठी वेगळी माणसे होती. पैसे मोजण्यापासून धातू तपासण्यापर्यंत सगळ्यांच्या जबाबदाऱ्या ठरलेल्या होत्या.

**दिवस-रात्र धूर :** सोने, चांदी आणि तांबे वितळवून त्यापासून नाणी व मोहरा तयार केल्या जायच्या. त्यामुळे खजिन्यातील चिमण्यांमधून सतत धूर निघायचा.


**राखही महत्त्वाची :** मोहरा तयार करताना उडणारी धातूची राखही जपली जायची. कारण त्या राखेत मौल्यवान धातूचे कण असण्याची शक्यता असायची.

**परदेशी व्यापारी :** परदेशातून व्यापारी भारतात सोने-चांदी आणायचे. बदल्यात त्यांना इथल्या बाजारात मागणी असलेल्या वस्तू मिळायच्या, त्यामुळे संपत्ती वाढत राहायची.

**मौल्यवान धातू :** अकबराच्या काळात सोनं-चांदी सहजपणे देशाबाहेर नेता येत नव्हतं. नियम मोडणाऱ्यांना शिक्षाही दिली जात असे, अशी नोंद आढळते.

# बिल गेट्सच्या पणजोबांची कबर सोलापुरात कशी?

**जाणून घ्या संपूर्ण सत्य**





**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नेटीव्ह ख्रिश्चन स्मशानभूमी ट्रस्टने दावा केला आहे की बिल गेट्स यांचे पणजोबा सॅम्युअल गेट्स हे ब्रिटीश काळात सोलापुरात आले होते आणि त्यांचे दफनही येथेच झाले.

### कोण होते सॅम्युअल गेट्स?

ट्रस्टच्या मते रेव्ह. लॉरेन सॅम्युअल गेट्स हे मिशनरी म्हणून भारतात आले. ते सोलापुरात राहत होते आणि लेप्रसी कॉलनी येथील चर्च त्यांनी उभारला. आजही तो गेट्स चर्च म्हणून ओळखला जातो.

### कसे झाले निधन?

त्यांनी सोलापूरसह महाराष्ट्र आणि कर्नाटकात मिशनरी कार्य केले. विजापूर येथेही त्यांचे वास्तव्य होते. ७ सप्टेंबर १९२२ रोजी विजापूर येथील दंगलीत ७७ वर्षांच्या सॅम्युअल गेट्स यांचा मृत्यू झाला. त्यांचे पार्थिव सोलापुरात आणण्यात आले.

### दफन कुठे?

डॉ. हेजन यांनी शवविच्छेदन केल्यानंतर मोदी स्मशानभूमी लगतच्या ख्रिश्चन स्मशानभूमीत त्यांना दफन करण्यात आले. तेथे कबर बांधण्यात आली होती.

### कबरीची सध्याची अवस्था

ट्रस्टचे संस्थापक अशोक ससाणे यांच्या मते, कबरीची प्रचंड दुरवस्था झाली आहे. मूर्ती आणि पितळी क्रॉस चोरीला गेले आहेत. संरक्षक भिंत अनेक ठिकाणी पडली आहे आणि काटेरी झुडुपांनी परिसर व्यापला आहे.

### शेजारील कबरीही दुर्लक्षित

सॅम्युअल गेट्स यांच्या कबरीशेजारी ब्रिटीश काळातील सोलापूरचे कलेक्टर गोल्डफिंच आणि मेरी बी. हार्डिंग (मेरी बी. हार्डिंग डी.एड. कॉलेजच्या संस्थापिका) यांच्या कबरी आहेत. त्यांचीही दुरवस्था झाली आहे.

### ट्रस्टची मागणी

अशोक ससाणे यांनी महापालिकेकडे लक्ष देण्याची आणि स्मशानभूमीची देखभाल करण्याची मागणी केली आहे.

### गेट्स परिवाराची वंशावळ

बिल गेट्स यांचा जन्म सिएटल, वॉशिंग्टन येथे झाला. वडील विल्यम एच. गेट्स (वकील) आणि आजोबा जे. डब्ल्यू. मॅक्सवेल (बँक अध्यक्ष) होते. अधिकृत नोंदींनुसार त्यांच्या पूर्वजांचा भारताशी किंवा सोलापूरशी कोणताही थेट संबंध आढळत नाही.

### दावा की वास्तव?

ही माहिती स्थानिक ट्रस्टने दिलेल्या दाव्यावर आधारित आहे. बिल गेट्स यांच्या अधिकृत वंशावळीत असा उल्लेख नसल्याने या दाव्याची स्वतंत्र पडताळणी आवश्यक आहे.

# समोसा त्रिकोणी आकारातच का बनविला जातो?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारताच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात समोसा मिळतो. अनेक लोकांचं आवडतं चाट देखील समोसाच आहे.

**त्रिकोणी आकार :** परंतु तुम्हाला हे माहिती आहे का? समोसा नेहमी त्रिकोणी आकाराचा का असतो? यामागील कारण जाणून घ्या.

**कार्यक्रम :** बर्थडे पार्टी असो किंवा कोणता कार्यक्रम असतो त्यात समोसाशिवाय पूर्ण होणार नाही. परंतु त्याचा आकार त्रिकोणीच असतो.

**सामग्री :** समोसा त्रिकोणी बनविण्यामागील महत्त्वाचे कारण म्हणजे समोसा तयार करताना त्यात मोठ्या प्रमाणात सामग्री भरली जाते.


**समोसा तळताना :** त्रिकोणी आकार केल्याने समोसा तळताना त्यातील सामग्री बाहेर पडत नाही.

**खाण्यासाठी सोयीस्कर :** समोस्याचा त्रिकोणी आकार हातात धरण्यासाठी आणि खाण्यासाठी सोयीस्कर आहे. त्यामुळे देखील त्याचा आकार तसा असतो.



**'साम्बुसाग' :** समोसा हा पूर्व आणि मध्य आशियातील फूड आहे. पर्शियन भाषेत त्याला साम्बुसाग म्हटलं जातं. हा शब्द पिरॅमिडच्या आकारशी संबंधित आहे.

**बटाटे :** सुरूवातीला समोशांमध्ये मांसाहारी पदार्थ भरले जात होते. परंतु नंतर पोर्तुगीजांनी बटाटे भारतात आणले आणि ते समोशांमध्ये भरले जाऊ लागले.



# पुरुषांनी केळी खाणे का गरजेचे?

## 'हे' आहेत आश्चर्यकारक फायदे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

केळी हे असे फळ हे जे प्रत्येक हंगामात उपलब्ध असते. केळी खाण्याचे बरेच फायदे आहेत.

**केळीचे फायदे :** केळी हा महिला तसंच पुरुषांच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. वजन कमी करण्यासाठी केळी मदत करते.

**पोषण :** केळीमध्ये उच्च पौष्टिक घट असतात. त्यामुळे शरीराला पोषण मिळण्यासाठी मदत होते.

**फायदे :** केळीमध्ये ब्रोमेलेन एंजाइम असतं त्यामुळे तुमची लैंगिक शक्ती वाढण्यास मदत करते.

**हृदय निरोगी :** केळीतील आढळणारे पोषक तत्त्व तसेच पोटॅशियम योग्य प्रमाणात असते. त्यामुळे ते हृदय निरोगी ठेवण्यास मदत करते.

**वजन कमी :** केळी खाल्ल्याने भूक लागत नाही. त्यामुळे तुमच्या वजनात सुद्धा फरक पडू शकतो.

**हाडे मजबूत :** केळीमध्ये कॅल्शियम आणि मॅग्नेशियम असल्यानं हाडे मजबूत करण्यासाठी केळी फायदेशीर ठरू शकते.

**पचनक्रिया :** केळीतील गुणधर्मामुळे पचनक्रिया मजबूत होते. त्यामुळे तुमच्या पोटाच्या समस्या दूर होऊ शकतात.

# डी-मार्टमध्ये मॅगी स्वस्त का मिळते? सीक्रेट आले समोर!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तुम्ही कधी डी-मार्टमधून मॅगी विकत घेतली आहे का? जर होय, तर ही बातमी तुमच्यासाठी आहे. कदाचित तुमच्या लक्षात आले असेल की डी-मार्टमध्ये मॅगीची किंमत किराणा स्टोअरपेक्षा कमी असते. तरीही कंपनी चांगला नफा कमावते. असे कसे होते, जाणून घ्या...




अनेकजण घरातील राशन खरेदी करण्यासाठी डी-मार्टमध्ये जातात. एकाच जागी सर्व गोष्टी आणि अतिशय स्वस्त दरात मिळतात. त्यामुळे डी-मार्ट महिनाभराचे रेशन भरण्यासाठी चांगला पर्याय आहे. तुम्ही डी-मार्टमधून कधी मॅगी खरेदी केली आहे? इतर दुकानांपेक्षा वेगळे, डी-मार्टमध्ये मॅगी नेहमीच कमी किमतीत विकली जाते. जरी तिची छापील किंमत जास्त असली तरी. ही किंमत ठरविण्याची रणनीती डी-मार्टला इतर किराणा रिटेलर्सपासून वेगळे करते.

एका यूट्यूब व्हिडिओमध्ये याबाबत माहिती देण्यात आली आहे. खरे तर 'डीप डिस्काउंटिंग'मुळे कंपनीला कमाई होते आणि ती आपल्या कस्टमर्सना डिस्काउंटेड रेटवर मॅगी देऊ शकते. डीप डिस्काउंटिंग म्हणजे प्रॉडक्ट खूप कमी किमतीत विकणे, जेणेकरून विक्रीचे प्रमाण वाढेल. समजा राजू भाईच्या दुकानात रोज १०० पॅकेट मॅगी १४ रुपयांना विकली जाते. त्यामुळे त्यांचा नफा प्रतिपॅकेट ५ रुपये होतो. म्हणजे एकूण ५०० रुपये. तर डी-मार्ट १००० पॅकेट १० रुपयांना विकते आणि त्याचा नफा प्रतिपॅकेट ३ रुपये आहे, जो एकूण ३००० रुपये होतो. हीच कारणे आहेत की कमी किमतीतही डी-मार्टचा नफा जास्त आहे. कारण विक्रीचे प्रमाण खूप मोठे आहे.

राजू भाईने विचार केला, की डी-मार्ट इतका स्वस्त माल कसा आणते. व्हिडिओमध्ये सांगितले आहे, की डी-मार्टसारखे मोठे स्टोअर्स आपल्या इमेज आणि नावामुळे फॅक्टरींमधून थेट बल्कमध्ये सामान खरेदी करतात. मॅगी कंपनीकडून त्यांना एक पॅकेट प्रिंट प्राइसला मिळते, पण आता मोठ्या खरेदीमुळे किंमत प्रिंट प्राइसपेक्षा कमी होते. यामुळे डी-मार्टचा नफा आणखी वाढला. राजू भाईसारख्या छोट्या दुकानांना घाऊक व्यापाऱ्याकडून १३-१४ रुपयांना खरेदी करावी लागते, त्यामुळे त्यांना प्रिंट प्राइसवरच मॅगी विकावी लागते.

डी-मार्ट ग्राहकांना स्वस्त मॅगी आकर्षित करते. लोक विचार करतात, की १४ रुपयांना मॅगी स्वस्त डील आहे, म्हणून ते तेथून दूध, चिप्स आणि इतर सामानही घेतात. व्हिडिओमध्ये सांगितले आहे, की हा लो मार्जिन-हाय व्हॉल्यूमचा मार्ग आहे. म्हणजे प्रतिपॅकेट कमी नफा, पण जास्त विक्रीमुळे एकूण कमाई वाढते. डी-मार्ट स्वस्त किमतीमुळे ग्राहकांचा विश्वास जिंकतात आणि दीर्घकाळ नफा कमावतात. याशिवाय डी-मार्टची सप्लाय चेन मॅनेजमेंट मजबूत आहे, जी खर्च कमी करते. त्यामुळे ते स्वस्त किमतीवर टिकून राहतात.

डी-मार्ट मोठ्या स्टोअर व्हॉल्यूम आणि बल्क खरेदीमुळे बाजार बदलत आहे. ग्राहक स्वस्त किंमत आणि सुविधांमुळे डी-मार्टला पसंती देत आहेत. तसेच कंपनी ग्राहकांना टिकवून ठेवण्यासाठी ही डीप डिस्काउंटिंगची रणनीती अवलंबते.




# श्रावण महिना सणासुदीचा आणि नवचैतन्याचा महिना



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

निसर्गाचे बदलते चक्र आणि समृद्ध परंपरा या दोन्हींच्या सुंदर मिलाफामुळे श्रावण महिन्याला आपल्या संस्कृतीत अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. चातुर्मासातील श्रेष्ठ महिना म्हणून श्रावणाकडे पाहिले जाते. आषाढी अमावस्येला दीपपूजन झाल्यानंतर आणि आषाढातील विविध परंपरांना निरोप दिल्यानंतर श्रावणाचे आगमन होते. या महिन्याबरोबरच वातावरणातही एक वेगळे चैतन्य निर्माण होते.

रिमझिम पाऊस आणि चकाकणारे ऊन यांचा पाठशिवणीचा खेळ सुरू होतो. कधी पावसाच्या सरी तर कधी स्वच्छ आकाश असे निसर्गाचे मनोहारी रूप अनुभवायला मिळते. या ऊन-पावसाच्या खेळात आकाशात सप्त रंगांची उधळण करणारे इंद्रधनुष्य दिसते आणि सारा निसर्गच जणू नव्या उत्साहाने न्हाऊन निघतो. संपूर्ण महिनाभर सण, उत्सव, व्रतवैकल्ये आणि धार्मिक परंपरांची रेलचेल सुरू राहते. त्यामुळे श्रावण म्हणजे निसर्गाप्रमाणेच मनामनांत नवचैतन्य निर्माण करणारा महिना होय.

या आनंदमयी महिन्याची सुरुवात होते ती भगवान शिवशंकराच्या आराधनेने आणि शिवामूठीच्या व्रताने. श्रावणातील प्रत्येक सोमवारी तांदूळ, तीळ, मूग, जव आणि सातू अशा क्रमाने धान्याच्या मुठी भगवान शंकराच्या पिंडीवर अर्पण केल्या जातात. विशेषतः नवविवाहित महिला हे व्रत मोठ्या भक्तिभावाने करतात.

खरे तर स्त्रियांसाठी, विशेषतः नवविवाहितांसाठी, श्रावण म्हणजे आनंदाची पर्वणीच असते. आपला संसार सुख, समाधान आणि प्रेमाने सदैव भरलेला राहावा, या भावनेने मंगळागौरीचे व्रत केले जाते. पहिल्या मंगळागौरीच्या पूजेला सख्या-सोबती, शेजारणी आणि आप्तेष्ट महिलांना आमंत्रित केले जाते. मंगळागौरीची पूजा, ओव्या, उखाणे, हळदी-कुंकू, ओटी भरणे, त्यानंतरचे जागरण आणि पारंपरिक खेळ यामुळे संपूर्ण वातावरण उत्साहाने भरून जाते. या निमित्ताने माहेर आणि सासर या दोन्हीकडून मिळणारे प्रेम व आपुलकी अनुभवण्याची सुंदर संधी मिळते. मराठमोळी पारंपरिक वेशभूषा परिधान करून महिला श्रावणातील या सप्तरंगी आणि आनंदमयी वातावरणाचा मनमुराद आनंद घेतात.

श्रावण महिन्यातील सण-समारंभांची मालिकाही तितकीच समृद्ध आहे. या मालिकेतील एक महत्त्वाचा सण म्हणजे नागपंचमी. शेतकऱ्याचा मित्र आणि निसर्गातील महत्त्वाचा घटक असलेल्या नागदेवतेचे या दिवशी पूजन केले जाते. नागदेवतेला दूध आणि लाह्यांचा नैवेद्य अर्पण केला जातो. महिलांसाठी तर नागपंचमी म्हणजे उत्साहाचा दिवसच! झिम्मा, फुगडी, झोके अशा पारंपरिक खेळांमध्ये रमून महिला आनंद साजरा करतात. सणाच्या निमित्ताने घराच्या चौकटीबाहेर पडून निसर्गाच्या सान्निध्यात काही आनंदाचे क्षण अनुभवण्याची संधीही त्यांना मिळते.

श्रावण पौर्णिमेला नारळी पौर्णिमा साजरी केली जाते. समुद्रकिनारी राहणाऱ्या कोळी बांधवांसाठी हा सण विशेष महत्त्वाचा आहे. ज्याच्या कुशीत त्यांचे संपूर्ण जीवन आणि उपजीविका अवलंबून आहे, त्या समुद्राला प्रेमपूर्वक नारळ अर्पण करून ते हा उत्सव साजरा करतात. रंगीबेरंगी पारंपरिक पोशाख, नृत्य, गाणी आणि उत्साहाने समुद्रकिनारा जणू फुलून जातो. नारळ अर्पण करून नव्या मासेमारीच्या हंगामासाठी समुद्रात होड्या सोडण्याची परंपरा आजही मोठ्या श्रद्धेने जपली जाते.

भाऊ-बहिणीच्या पवित्र आणि प्रेमळ नात्याचे महत्त्व अधोरेखित करणारा सण म्हणजे रक्षाबंधन. बहिणीने भावाच्या मनगटावर राखी बांधल्यानंतर भाऊ तिच्या प्रेमाची परतफेड आशीर्वाद, भेटवस्तू आणि ओवाळणीच्या रूपाने करतो. या दिवशी रक्ताच्या नात्यापलीकडे जाऊन सामाजिक बांधिलकी जपण्याचेही अनेक सुंदर उपक्रम केले जातात. निराधार आणि अनाथ बांधवांना राखी बांधून काही भगिनी सामाजिक ऋणानुबंध जपतात. नवविवाहित महिलांसाठी तर रक्षाबंधन हा माहेरच्या ओढीचा आणि आप्तस्वकीयांच्या प्रेमाचा आनंद देणारा दिवस असतो.

श्रावणातील उत्सवांची सांगता जवळ येत असताना श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि दहीहंडीचा उत्साह संपूर्ण वातावरण व्यापून टाकतो. श्रीकृष्ण जन्माच्या दुसऱ्या दिवशी साजऱ्या होणाऱ्या दहीहंडीच्या उत्सवात 'गोविंदा आला रे आला'च्या जयघोषाने आसमंत दुमदुमून जातो. गोविंदा पथकांचा उत्साह, मानवी मनोरे उभारण्याचा थरार, दहीहंडी फोडण्याची चुरस आणि त्यातच रिमझिम बरसणारा पाऊसया सगळ्यामुळे आनंदाला अक्षरशः उधाण येते. काळानुसार या उत्सवाचे स्वरूप व्यापक झाले असले, तरी त्यामागील संस्कृती, परंपरा आणि सामूहिक उत्साह आजही मोठ्या अभिमानाने जपला जातो.

अशा प्रकारे सण, उत्सव आणि व्रतवैकल्यांनी बहरलेला श्रावण महिना हळूहळू निरोप घेऊ लागतो. पिठोरी अमावस्येला पिठोरी देवीची मनोभावे पूजा करून या पवित्र महिन्याला निरोप दिला जातो. निसर्ग, श्रद्धा, संस्कृती, नाती आणि परंपरा यांचा सुंदर संगम घडवणारा हा महिना मनामध्ये असंख्य आनंददायी आठवणी ठेवून पुढे जातो.

श्रावण सरता सरता मात्र सर्वांच्या मनाला वेध लागतात ते आपल्या लाडक्या गणरायाच्या आगमनाचे. पुन्हा घराघरांत लगबग सुरू होते, सजावटीची तयारी होते आणि वातावरणात भक्तीचा नवा रंग भरू लागतो. श्रावणातील सणांच्या सप्तरंगी आठवणी मनात साठवून आपण उत्सुकतेने वाट पाहू लागतो ती आपल्या लाडक्या बाप्पाच्या आगमनाची!

**असा हा श्रावण निसर्गाच्या नवचैतन्याचा, सण-उत्सवांचा, श्रद्धेचा आणि नात्यांमधील प्रेमाचा अविस्मरणीय महिना!**

# गौरी-शंकर : परम प्रेम, तप आणि अखंड सृष्टीच्या समतोलाचे शाश्वत प्रतीक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**"जिथे गौरी, तिथे शंकर...**
**जिथे भक्ती, तिथे मुक्ती..."**

गौरी-शंकर हे केवळ पती-पत्नीचे दैवी युगुल नाही, तर प्रेम, त्याग, तपश्चर्या, भक्ती आणि सृष्टीच्या समतोलाचे शाश्वत प्रतीक मानले जाते. भारतीय आध्यात्मिक परंपरेत भगवान शंकर आणि माता पार्वती यांचे नाते अत्यंत पवित्र आणि आदर्श मानले गेले आहे. वेद, पुराणे, आगमशास्त्र तसेच विविध भक्तिपर ग्रंथांमध्ये या दैवी युगुलाचे महत्त्व विविध प्रकारे अधोरेखित झालेले आढळते.



### माता गौरी म्हणजे कोण?

माता गौरी म्हणजेच माता पार्वती. हिमालयाची कन्या म्हणून त्यांना गिरिजा, उमा, भवानी, शिवा अशा विविध नावांनी संबोधले जाते. पूर्वजन्मी त्या माता सती होत्या. भगवान शंकरांवरील अखंड प्रेम आणि निष्ठेमुळे त्यांनी पुनर्जन्म घेऊन पुन्हा कठोर तपश्चर्या केली आणि भगवान शंकरांना पतीरूपाने प्राप्त केले.

माता पार्वतींची तपश्चर्या ही त्यांच्या दृढ संकल्पाचे, भक्तीचे आणि अढळ प्रेमाचे प्रतीक आहे. त्यांच्या या तपश्चर्येने भगवान शंकर प्रसन्न झाले आणि गौरी-शंकर यांचे दैवी मिलन घडून आले. या कथेतून प्रेमामध्ये निष्ठा, संयम, त्याग आणि समर्पण यांचे किती महत्त्व आहे, याचा सुंदर संदेश मिळतो.

### भगवान शंकरांचे वैराग्य आणि करुणा

भगवान शंकर हे योगी, वैराग्याचे मूर्तिमंत स्वरूप आणि विश्वकल्याणासाठी सदैव तत्पर असलेले देव मानले जातात. ते अनासक्त असूनही माता गौरींच्या प्रेमाचा आणि तपश्चर्येचा आदर करून गृहस्थाश्रम स्वीकारतात.

भगवान शंकरांचे हे रूप त्यांच्या करुणा, प्रेम आणि भक्तवत्सल स्वभावाची अनुभूती करून देते. एका बाजूला कैलासावर समाधीस्थ असलेले महायोगी आणि दुसऱ्या बाजूला माता गौरींच्या प्रेमाचा सन्मान करणारे गृहस्थरूपया दोन्ही रूपांचा सुंदर संगम म्हणजे गौरी-शंकर.

### गौरी-शंकर : शिव आणि शक्तीचे अद्वैत

भारतीय तत्त्वज्ञानात भगवान शंकरांना 'शिव' आणि माता पार्वतींना 'शक्ती' असे संबोधले जाते. शिव आणि शक्ती यांचे नाते अविभाज्य आहे. "शक्तीविना शिव म्हणजे शव" या भावनेतून शिव-शक्तीच्या एकत्वाचे महत्त्व स्पष्ट होते. शिव हे चेतनेचे, तर शक्ती ही सर्जनशक्तीचे प्रतीक मानली जाते. या दोन्ही तत्त्वांच्या एकत्वातून सृष्टीचा प्रवाह अखंड सुरू राहतो. याच एकत्वाचे अत्यंत प्रभावी प्रतीक म्हणजे अर्धनारीश्वर स्वरूप. या स्वरूपातून स्त्री आणि पुरुष तत्त्वांचे परस्परपूरकत्व, समानता आणि सृष्टीच्या संतुलनाचे गूढ तत्त्व अधोरेखित होते.

### संतती आणि सृष्टीकल्याण

माता गौरी आणि भगवान शंकर यांच्या दैवी युगुलातून श्रीगणेश आणि भगवान कार्तिकेय यांसारख्या देवतांचा जन्म झाल्याचे पुराणपरंपरेत वर्णन आढळते. श्रीगणेश हे बुद्धी, विवेक आणि मंगलकार्यांचे अधिष्ठाता मानले जातात, तर भगवान कार्तिकेय हे शौर्य आणि पराक्रमाचे प्रतीक आहेत. त्यामुळे गौरी-शंकर यांचे दैवी युगुल हे केवळ वैवाहिक प्रेमाचे प्रतीक न राहता ज्ञान, शक्ती, शौर्य, भक्ती आणि मंगलतेच्या व्यापक भावनेचे प्रतीक ठरते.

### गौरी-शंकर पूजनाचे आध्यात्मिक महत्त्व

श्रावण मास, महाशिवरात्र, हरतालिका तृतीया, गौरी पूजन यांसारख्या धार्मिक प्रसंगी माता गौरी आणि भगवान शंकरांची भक्तिभावाने पूजा केली जाते. विवाहित स्त्रिया आपल्या वैवाहिक जीवनातील सुख, सौख्य आणि अखंड प्रेमासाठी माता पार्वतींचे स्मरण करतात. कुमारिका देखील उत्तम जीवनसाथी आणि मंगलमय वैवाहिक जीवनासाठी माता गौरींची भक्ती करतात. "ॐ गौरीशंकराय नमः" या मंत्राचा भक्तिभावाने जप केल्याने मनामध्ये श्रद्धा, सकारात्मकता आणि शांततेची भावना निर्माण होते, अशी भक्तांची श्रद्धा आहे.

### प्रेम, तप आणि समर्पणाचा संदेश

गौरी-शंकरांचे नाते आपल्याला एक महत्त्वपूर्ण संदेश देतेखरे प्रेम केवळ आकर्षणात नसते; ते विश्वास, त्याग, संयम, तपश्चर्या आणि परस्पर आदरातून अधिक दृढ होते. माता गौरींची अढळ भक्ती आणि भगवान शंकरांची करुणा यांचा संगम म्हणजे प्रेमाचे दैवी रूप होय. म्हणूनच गौरी-शंकर हे युगुल भारतीय संस्कृतीत आदर्श दाम्पत्य, शिव-शक्तीचे अद्वैत आणि सृष्टीच्या संतुलनाचे प्रतीक मानले जाते.

### शास्त्रीय व आध्यात्मिक संदर्भ

गौरी-शंकरांच्या दैवी स्वरूपाचे विविध संदर्भ शिवमहापुराणातील रुद्रसंहिता व पार्वतीखंड, कालिदासांचे 'कुमारसंभव', स्कंदपुराण, श्रीमद् देवीभागवत तसेच आदि शंकराचार्यांच्या 'सौंदर्यलहरी' यांसारख्या ग्रंथपरंपरेत आढळतात.

### भक्तिभावातील काही ओळी

**"गौरीच्या प्रेमळ पदरात**
**शंकरांची समाधी विसावते,**
**जगताच्या कणाकणातून**
**शिव-शक्तीची भक्ती निनादते.**
**तपातून उमलते प्रेम,**
**समर्पणातून नाते फुलते;**
**गौरी-शंकरांच्या चरणी**
**भक्तीचे जीवन मंगल होते..."**

गौरी-शंकर हे प्रेम, तप, त्याग, भक्ती आणि समर्पणाचे शाश्वत प्रतीक आहे. या दैवी युगुलाचे मनोभावे स्मरण करून आपल्या जीवनातही प्रेम, संयम, परस्पर आदर आणि श्रद्धेचा प्रकाश जागवूया.

**॥ श्री गौरी-शंकरार्पणमस्तु ॥**

# दीप अमावस्येला दिवे घासून-पुसून स्वच्छ का करतात?


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आषाढ अमावस्येला 'दीप अमावस्या' म्हणून घरातील दिवे आणि समया स्वच्छ करण्याची परंपरा आहे. अनेकजण याकडे केवळ एक धार्मिक विधी म्हणून पाहतात. मात्र, पावसाळ्याच्या दिवसांत घरात वाढणारा दमटपणा, बॅक्टेरिया आणि जंतूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ही स्वच्छता किती महत्त्वाची आहे, याचा मोठा वैज्ञानिक दृष्टिकोन या परंपरेमागे दडला आहे. चला तर मग सायन्सच्या अँगलनं जाणून घेऊया.

आज दीप अमावस्येला घरातील दिवे आणि समया धुतात. आता यामागे केवळ धार्मिक कारण नसून सायन्स देखील आहे. पावसाळ्यात सूर्यप्रकाश कमी असल्याने हवेत ओलसरपणा आणि रोगराई वाढते. अशा वेळी पितळ आणि तांब्याच्या दिव्यांवर चढणारा ऑक्साईडचा थर आरोग्यासाठी घातक ठरू शकतो. म्हणूनच दीप अमावस्येला हे दिवे निर्जंतुक करून त्यात तेल-तूप लावून प्रज्वलित केले जातात, ज्यामुळे घरातील हवा शुद्ध होते आणि नैसर्गिक उष्णता निर्माण होते. चला तर मग याविषयी सायन्सच्या अँगलने अधिक विस्ताराने जाणून घेऊया.

दीप अमावस्या किंवा दिव्याची अमावस्येच्या या परंपरेमागे केवळ धार्मिकच नाही, तर अतिशय महत्त्वाचे वैज्ञानिक आणि आरोग्याशी संबंधित कारणे आहेत. दिवे धुण्यामागची शास्त्रीय कारणे खालीलप्रमाणे आहेत.

## विज्ञान सांगतंय यामागचं गुपित!



### कीटक आणि जंतूंचा प्रादुर्भाव रोखणे

आषाढ महिना म्हणजे पावसाळ्याचा (चातुर्मासाचा) मध्य काळ असतो. या दिवसांत दमट वातावरणामुळे हवेत बॅक्टेरिया, बुरशी आणि डास-कीटकांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढते. दिव्यांमध्ये साचलेले जुने तेल आणि काजळी हे जंतूंचे प्रजननाचे केंद्र बनू शकतात, म्हणूनच ते स्वच्छ करणे गरजेचे असते.

### हवेचे शुद्धीकरण

या दिवशी दिवे स्वच्छ करून त्यात शुद्ध तूप, तीळ किंवा मोहरीचे तेलघालून ते लावले जातात. शास्त्रीयदृष्ट्या, जेव्हा नैसर्गिक तेल किंवा तूप जळते, तेव्हा वातावरणात 'अँटी-मायक्रोबियल' (जंतूनाशक) घटक हवेत पसरतात, ज्यामुळे घरातील हवा शुद्ध होते आणि दमटपणामुळे येणारा दुर्गंध दूर होतो.

### धातूची स्वच्छता आणि आरोग्य

घरातील दिवे प्रामुख्याने पितळ किंवा तांब्याचे असतात. पावसाळ्यातील आर्द्रतेमुळे या धातूंवर हिरवट किंवा काळ्या रंगाचा ऑक्साईडचा थर (गंज) चढतो. हा थर आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतो. पारंपरिक पद्धतीने लिंबू, चिंच किंवा पितांबरी वापरून हे दिवे घासल्याने त्यांचे ऑक्सिडेशन निघून जाते आणि धातू निर्जंतुक होतो.

### प्रकाश आणि उष्णतेची निर्मिती


पावसाळ्यात सूर्यप्रकाश कमी असतो, ज्यामुळे घरात अंधार आणि ओलसरपणा वाढतो. स्वच्छ केलेल्या दिव्यांची ज्योत स्थिर आणि प्रखर जळते. यामुळे घरात नैसर्गिक उष्णता निर्माण होते, जी हवेतील ओलावा कमी करण्यास मदत करते.

### मानसिक आरोग्य

पावसाळ्यातील ढगाळ आणि अंधारमय वातावरणामुळे अनेकांना आळस किंवा मानसिक थकवा जाणवतो. घर स्वच्छ करून एकाच वेळी अनेक दिवे लावल्याने मिळणारा लख्ख प्रकाश मानवी मनामध्ये सकारात्मक ऊर्जा आणि उत्साह निर्माण करतो, असे मानसशास्त्र सांगते.

आपल्या भारतीय संस्कृतीतील अनेक सण आणि परंपरांच्या मुळाशी निसर्गाचा नियम आणि आरोग्याचे मोठे विज्ञान दडलेले आहे. दीप अमावस्येला दिवे घासून स्वच्छ करण्याची ही पद्धत केवळ धार्मिक विधी नसून, पावसाळ्याच्या दिवसांत रोगराई पसरू नये आणि घरातील वातावरण जंतूमुक्त व शुद्ध राहावे, यासाठी पूर्वजांनी सुरू केलेली एक शास्त्रशुद्ध आरोग्यदायी मोहीम आहे. विज्ञानाची हीच बाजू समजून घेऊन सण साजरे केल्यास आपल्या आरोग्यासोबतच सणांचा आनंदही द्विगुणित होतो.


वारंगल श्री विद्या सरस्वती मंदिर


पुष्करचे सरस्वती मंदिर


शृंगेरी मंदिर


पणचिक्कड सरस्वती मंदिर


श्री ज्ञान सरस्वती मंदिर

# सरस्वती देवींची भारतातील ५ प्रमुख मंदिरे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सरस्वती अर्थात शारदा देवींची भारतात विविध ठिकाणी मंदिरे आहेत. मात्र, आंध्र प्रदेश, राजस्थान व केरळमधील मंदिरांचा या प्रमुख मंदिरांमध्ये प्रामुख्याने समावेश आहे. या मंदिरांच्या भेटीसाठी वसंत पंचमीला जाणे अतिशय शुभदायी मानले जाते.

### वारंगल श्री विद्या सरस्वती मंदिर

येथे हंस वहिनी विद्या सरस्वती मंदिरात माता सरस्वती यांची पूजा केली जाते. हे मंदिर आंध्र प्रदेशातील बेडूक जिल्ह्यातील वारंगल येथे आहे. कांची शंकर मठ मंदिराची देखभाल करतो. या ठिकाणी श्री लक्ष्मी गणपती मंदिर, भगवान शनिश्वर मंदिर आणि भगवान शिव मंदिर यांसारखी इतर देवतांची मंदिरेही बांधण्यात आलेली आहेत.

### पुष्करचे सरस्वती मंदिर

राजस्थानचे पुष्कर हे ब्रह्मा मंदिरासाठी प्रसिद्ध आहे, तर तेथे विद्येची देवी सरस्वती यांचे प्रसिद्ध मंदिर आहे. सरस्वतींच्या नदी स्वरूपाचे पुरावे देखील आहेत आणि त्यांना प्रजनन आणि शुद्धतेचे प्रतीक मानले जाते.

### शृंगेरी मंदिर

येथील शारदा मंदिर खूप लोकप्रिय आहे. याला शारदंबा मंदिर असेही म्हणतात. ज्ञान आणि कलांची देवता शारदंबा यांना समर्पित, दक्षिणाम्नाय पीठ ७ व्या शतकात आचार्य श्री शंकरा भागवतपाद यांनी बांधले होते. पौराणिक कथांनुसार १४ व्या शतकात प्रमुख देवतेची प्राचीन चंदनाची मूर्ती सोन्याने आणि दगडाने कोरलेली होती.




### पणचिक्कड सरस्वती मंदिर

हे मंदिर पणचिक्कड केरळमध्ये आहे. हे केरळमधील एकमेव मंदिर आहे जे देवी सरस्वती यांना समर्पित आहे. या मंदिराला दक्षिणा मूकांबिका असेही म्हणतात. हे मंदिर चिंगावनमजवळ आहे. असे मानले जाते, की या मंदिराची स्थापना किझेप्पुरम नंबूदिरी यांनी केली होती. त्यांनी ही मूर्ती शोधून पूर्वेकडे तोंड करून बसविली. दुसरा पुतळा पश्चिमेकडे तोंड करून उभारण्यात आला; पण त्याला आकार नाही. पुतळ्याजवळ एक दिवा आहे जो सतत तेवत असतो.

### श्री ज्ञान सरस्वती मंदिर

सरस्वती देवींच्या अतिशय प्रसिद्ध मंदिरांपैकी एक हे आंध्र प्रदेशातील आदिलाबाद जिल्ह्यात स्थित आहे जे बसर किंवा बसरा म्हणून प्रसिद्ध आहे. बासरमध्ये देवी ज्ञानाला ज्ञान देणाऱ्या सरस्वती म्हणून ओळखल्या जातात. हे मंदिर गोदावरी नदीकाठावर आहे. पौराणिक कथेनुसार महाभारतातील युद्धानंतर ऋषी व्यास शांतीच्या शोधात निघाले. ते गोदावरी नदीकाठावरील कुमारचाला टेकडीवर पोहोचले आणि त्यांनी देवींची पूजा केली. त्याच्यावर प्रसन्न होऊन देवींनी त्यांना दर्शन दिले. देवींच्या आज्ञेवरून ते रोज तीन मूठ वाळू तीन ठिकाणी ठेवत असत. चमत्कारिकरित्या वाळूचे हे तीन ढीग सरस्वती, लक्ष्मी आणि काली नावाच्या तीन देवींच्या मूर्तींमध्ये बदलले.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथ, समाजमाध्यमे अर्थात सोशल मीडियावरून संकलीत केली आहे.)**